महाराष्ट्र शासन
नगरपरिषद प्रशासन संचालनालय

दूरध्वनी क्र.०२२-२४९२७६३१, विस्तारीत क्र.११५
ई -मेल-mcemp.dma@gmail.com
संकेतस्थळhttps://mahadma.maharashtra.gov.in

नवीमुंबई महानगरपालिका इमारत,
७ वा मजला बेलापूर भवन (सी.बी.डी.)
बेलापूर, नवी मुंबई-४००६१४.

क्र. नपाप्रस/२०२३/वा.ह./स. का./प्र.क्र.५०-२०१७/कक्ष -४ (६)/1683 दिनांक - 21 FEB 2025

प्रति,

१. विभागीय सह आयुक्त,
विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक
कार्यालय (सर्व)

२. जिल्हा सह आयुक्त,
नगरपरिषद प्रशासन शाखा,
जिल्हाधिकारी कार्यालये (सर्व)

३. मुख्याधिकारी, नगरपरिषद/नगरपंचायत (सर्व).

**विषय- लाड समितीच्या शिफारशींच्या अनुषंगाने सफाई कामगारांच्या वारसा हक्काच्या अंमलबजावणीबाबत दि.२४.०२.२०२३ च्या शासन निर्णयान्वये विहित सुधारित तरतुदीनुसार कार्यवाही करणेबाबत.**

**संदर्भ- १)सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांचे पत्र क्रमांक-सफाई/ २०१८ /प्र.क्र.४६/ सआक,/ दिनांक २८.०१.२०२५.**

**२) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्रमांक-सफाई २०१८/प्र.क्र.४६/सआक, दिनांक २४/०२/२०२३.**

**३) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय सुधारणा/शुध्दीपत्रक क्रमांक-सफाई २०२४/प्र.क्र.१६/सआक, दिनांक ११/३/२०२४,**

**४) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्रमांक-सफाई २०२४/प्र.क्र.७०/सआक, दिनांक १३/१०/२०२४,**

सामाजिक न्याय व विशेष सहाय विभागाच्या दिनांक २८.०१.२०२५ रोजीच्या पत्रान्वये सर्व मंत्रालयीन विभाग,सर्व महानगरपालिका ,नगरपरिषद प्रशासन संचालनालय व समाज कल्याण आयुक्त यांना लाड समितीच्या शिफारशीनुसार सफाई कामगारांच्या वारसांना नियुक्ती देण्यासंदर्भात नियमानुसार तात्काळ कार्यवाही करणेबाबत कळविले आहे.

तसेच लाड समितीच्या शिफारशीनुसार सफाई कामगारांच्या वारसांना वारसा हक्काने नियुक्ती देण्यासंदर्भात संचालनालयाकडे विविध संघटना/ उमेदवार/ स्थानिक स्वराज्य संस्था इत्यादीकडून वारंवार अनावश्यक मार्गदर्शन मागविण्यात येत आहे. तसेच नगरपालिका स्तरावर निकाली निघू शकणारी अनेक पात्र प्रकरणे पत्र व्यवहारांमध्ये अडकून विलंब होत आहे व या कार्यालयाचे काम अनावश्यक वाढत आहे.

त्यामुळे सामाजिक न्याय व विशेष सहाय विभाग यांचे पत्र क्रमांक-सफाई/ २०१८/प्र.क्र.४६/ सआक,/ दिनांक २८.०१.२०२५ रोजीच्या पत्रानुसार सर्व मुख्याधिकारी नगरपरिषद /नगरपंचायत व संबंधितांनी सदर प्रकरणे नियमानुसार कार्यवाही करून तातडीने निकाली काढण्यासंदर्भात खालीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत.

१) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्रमांक-सफाई २०१८/प्र.क्र.४६/सआक, /दि.२४.२.२०२३ च्या शासन निर्णयान्वये शासनाने लाड समितीच्या शिफारशीच्या अनुषंगाने सफाई कामगारांच्या वारसा हक्काबाबत यापूर्वी निर्गमित केलेले सर्व शासन निर्णय/परिपत्रके अधिक्रमित करून एकत्रित सुधारीत नवीन तरतुदी लागू केल्या आहेत. **त्यामुळे सदर विषयाशी संबंधित यापूर्वीचे नगरपरिषद प्रशासन संचालनालयाचे सर्व आदेश /परिपत्रके इत्यादी रद्द झाल्याचे समजण्यात यावे.**

वरील आदेशान्वये सामाजिक न्याय व विशेष सहाय विभागाने सफाई कामगाराची व्याख्या, वारसा हक्काची तरतूद, पात्र वारस, वारसाची वयोमर्यादा नियुक्तीसाठी अनुसरावयाची कार्यपद्धत इत्यादी संदर्भात परिपूर्ण व सविस्तर आदेश दिलेले आहेत सदर आदेशाचे काटेकोर पालन करण्यात यावे.

२) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय सुधारणा/शुध्दीपत्रक क्रमांक-सफाई २०२४/प्र.क्र.१६/ सआक/दिनांक ११.०३.२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये पात्र वारसांच्या यादीमध्ये विवाहीत मुलीचा समावेश केला आहे.

३) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्रमांक-सफाई २०२४/प्र.क्र.७०/सआक /१३/१०/२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये दिनांक १२/८/१९७५ ते दिनांक २३/२/२०२३ पर्यंतच्या वारसा हक्काच्या प्रलंबित प्रकरणी सदर विभागाच्या दिनांक २४/०२/२०२३ च्या शासन निर्णयानुसार योग्य ती कार्यवाही करणेबाबत आदेश दिले आहेत.

४) सामाजिक न्याय व विशेष सहाय विभागाच्या दिनांक २८.०१.२०२५ रोजीच्या पत्रामध्ये मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांनी रिट याचिका क्र. ३२०४/२०२३ (श्री.गोरोबा राम आरदवाड व इतर विरुद्ध महाराष्ट्र शासन) मध्ये खालीलप्रमाणे दिलेल्या दिनांक ०८.०१.२०२५ रोजीच्या आदेशाचे पालन करणेबाबत त्याचप्रमाणे दिनांक २४/०२/२०२३ च्या शासन निर्णयानुसार योग्य ती नियमानुसार कार्यवाही करणेबाबत सूचित केलेले आहे.

५) प्रस्तुत प्रकरणी मा. उच्च न्यायालयाने दिनांक ०८/०१/२०२५ रोजी आदेश पारीत केलेले असून सदर आदेशाचा थोडक्यात तपशील खालीलप्रमाणे आहे

We expect the appointing authorities of the establishments should follow Government Resolution dated **24.02.2023**. The individual claims should be considered objectively. We are therefore passing following directions in all petitions:-

(i) The appointments and claims to the post of Safal Kamgar shall be regulated by Government Resolution dated **24.02.2023** which shall be implemented by the Employers, Appointing Authorities or the Competent Authorities of the Establishments.

(ii) The Appointing Authorities, Employers, or the Competent Authorities of the Establishments shall conduct objective scrutiny of individual claims of the Petitioners expeditiously in accordance with the Government Resolution dated **24.02.2023**.

(iii) The Petitioners or the Intervenors shall be at liberty to submit their applications before the Appointing Authorities, Employers or the Competent Authorities of the Establishments, if not submitted earlier.

(iv)The Appointing Authorities, Employers, or the Competent Authorities of the Establishments shall conduct objective scrutiny of the claims and extend the opportunity to submit relevant documents to the Claimants and decide the individual claims within period of six weeks from the date of receipt of the applications.

(v) In case of rejection of the claims, it shall be open to resort to the remedy as permissible in law.

तरी, लाड समितीच्या शिफारशीच्या अनुषंगाने सफाई कामगारांच्या वारसाना वारसा हक्काने नियुक्ती द्यावयाची सर्व प्रकरणे संबधित मुख्याधिकारी नगरपरिषद हे नियुक्ती प्राधिकारी असल्यामुळे नगरपरिषदेच्या मंजूरीने स्थानिक स्तरावर नियमानुसार निर्णय घेऊन तातडीने निकाली काढावीत. अनावश्यक पत्र व्यवहार / कालापव्यय करू नये, याबाबत नोंद घ्यावी.

(मनोज रानडे, भा.प्र.से.)
आयुक्त तथा संचालक
नगरपरिषद प्रशासन संचालनालय,
नवी मुंबई